# पुणे विद्यापीठ


दूरध्वनी क्रमांक : ०२०२५६०१२१८ टेलिग्राफ : युनिपुना
Website : www.unipune.ac.in फॅक्स : ०२०२५६०१२०६
Email : certificate@unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा समन्वय / दि . १३-१०-२०१२

मा. प्राचार्य/ संचालक,

पुणे शहर(मनपा हद्द), पुणे ग्रामीण, अ. नगर व नाशिक जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त संस्था.

विषय: महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांचे कार्यशाळेच्या आयोजनाबाबत...

महोदय/महोदया,

आपणास ज्ञात आहेच की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व महाविद्यालय/संस्थांनी परीक्षा आयोजनाचे कामासाठी महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी नियुक्त करावेत असे यापूर्वीच सर्वांना कळविले आहे. आपल्या महाविद्यालय/ संस्थेत महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी नियुक्त करून विद्यापीठास कळविले त्याबद्दल प्रथमत: धन्यवाद. यापूर्वीच कळविल्या प्रमाणे कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले असून कार्यक्रम पत्रिका सोबत जोडली आहे. आपण नियुक्त केलेल्या महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना सदर कार्यशाळेस त्यांचे नियुक्ती संबंधी पत्राचे प्रतिसह उपस्थित राहण्यास सांगावे.

उपस्थित महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विद्यापीठ नियमांनुसार प्रवास भत्ता व दैनंदिन भत्ता देय राहीन, महाविद्यालयाने संबंधीतास द्यावयाचा असून त्याची प्रतिपूर्ती परीक्षा खर्चासाठी दिलेल्या उचल रकमेतून करावी.

ज्या महाविद्यालय/ संस्थांनी अद्याप महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी नियुक्त केले नसतील त्यांनी त्वरित नियुक्ती करून विद्यापीठास पूर्वीच्या पत्रांनुसार कळवावे. तसेच नियुक्त महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे कार्यशाळेस उपस्थित राहण्यास सांगावे, ही विनंती.

कळावे,

आपली,

परीक्षा नियंत्रक